# प्रेसनोट

दिनांक– २१/११/२०१८.

## उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भिवंडी येथील स्टेनो यांना लाच स्विकारताना अटक

दिनांक २०/११/२०१८ रोजी, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भिवंडी येथील स्टेनो, सुनिल तुकाराम कांबळे, वय–५० वर्षे यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १४,००,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांची मौजे अस्नोली ता. भिवंडी, जि. ठाणे येथील शेतजमिनीबाबतचा फेरफार रद्द करण्याचा निकाल देण्यासाठी, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १५,००,०००/–रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्यां अनुषंगाने पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन असेबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करुन तडजोडीअंती लोकसेवक सुनिल तुकाराम कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडून १४,००,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास श्री.बाळकृष्ण सावंत, पोलीस उप अधीक्षक, असेबी, ठाणे हे करत आहेत.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979 / 022-27833344**
३) ई–मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner